Vol 3 Issue 2 March 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2, March. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# " अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील गुन्हेगारी "

*प्राचार्य डॉ. बी. व्ही. चौधरी,*

वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर,
सोलापूर,

## *सारांश*

प्राचीन भारतीय गुन्ह्याचे स्वरूप आजच्या सारखेच असले तरी त्याचे स्वरूप 'अधर्म' च्या व्याख्येत बसत असत. धर्म आणि अधर्म या दोनच संकल्पना अस्तित्वात होत्या. या गुन्ह्यास 'पातक' हा शब्द धर्मशास्त्राच्या दृष्टीने वापरला जात असावा.'पातक' हा शब्द नीतिशास्त्रातील परिभाषेपेक्षा धार्मिक परिभाषेतील प्रचारात अधिक येतो.

## *प्रस्तावना*

'पातक' या शब्दाचा अर्थ सामान्यपणे असा सांगितला जातो की, जे कृत्य केल्याने देवाने सांगितलेल्या अथवा देवप्रणित मानलेल्या धर्मग्रंथात दिलेल्या नियमांचे बुध्दिपुरस्सर उल्लंघन होते अथवा अवज्ञा होते अथवा निदान अशा ग्रंथात घालून दिलेल्या नियमांचे परिपालन केले जात नाही हे कृत्य.

***ऋग्वेदाने सांगितलेली पातक*** (१) ब्रम्हहत्या, (२) भ्रूणहत्या, (३) सुरापान, (४) चोरी, (५) गुलरल्पगमन, (६) दुष्कृत्यांची पुनरावृत्ती, (७) खोटे बोलणे ही सात पातके म्हणजे गुन्हे ब्तपउम या सदरात मोडणारी आहेत[१].
या महापातकाचे विवेचन करताना भारतरत्न डॉ. म. म. काणे लिहितात –

### *(1) ब्रम्हहत्या :–*

कोणीही मनुष्य एखाद्या ब्राम्हणाच्या मृत्यूला पाच प्रकारांनी कारणीभूत होऊ शकतो. तो प्रकार म्हणजे स्वतरुच ब्राम्हणांची हत्या करून किंवा दुसऱ्याा कोणाला ब्राम्हणाचा वध करण्याची आज्ञा करून, उत्तेजन देऊन किंवा मदत करील किंवा त्या ब्राम्हणास पिडा देऊन त्यास मरणासाठी प्रवृत्त करील तर त्यास ब्रम्हहत्येचे पातक लागते. यासोबतच ब्राम्हण स्त्रीबरोसबर संभोग करणे आणि कपिला गाईचे दूध प्राशन करणे हे ही महापातक मानले आहे.

### *(2) सुरापान :–*

सुरापान म्हणजे मद्य प्राशन करणे हे ही महापातक मानले जाते. गुळापासून, काकवीपासून, पिठापासून, मोहाच्या फुलापासून अथवा मधापासून तयार केलली सुरा (मद्य) असते. त्यापैकी पिठापासून तयार केलेली सुरा प्राशन करण्याची तीन उच्च दर्जाच्या लोकांना बंदी असे, असे सुरापान केल्यास महापातक लागत असे.

मद्यपान ब्राम्हणांना निशिध्द असे, परंतु गौडी अथवा माध्वी प्रकारची सुरा प्राशन करणाऱ्याा ब्राम्हणांना महापातकाचा दोष न लागता अनुतापाचा दोष लागत असे. सर्व वर्णाच्या ब्रम्हचाऱ्यांनी सर्व प्रकारच्या उन्मादक पदार्थापासून अलिप्त राहिले पाहिजे असा दंडक होता.

### *(3) स्तेय (चोरी) :–*

एखाद्या ब्राम्हणाजवळचे काही विशिष्ट वजनाचे सोने चोरले तरच ती चोरी महापातक संज्ञेला पात्र होत असे. स्तेय म्हणजे चोरी या व्याख्येत कोणत्याही अवस्थेत असलेल्या परकीय मनुष्याच्या मिळकतीचा लोभ धरणे किंवा ती त्या मालकाच्या अनुमतीशिवाय घेणे हे कृत्य चोरी समजले जाई.

*(4) गुर्वङ्गनागम :–*

गुरूच्या पत्नीबरोबर संभोग हा अपराध करणाऱ्याला 'गुरूतल्पग' अशी संज्ञा आहे. गुर्वङ्गना ह्या शब्दामध्ये आचार्याची पत्नी, स्वतःची माता, स्वतःच्या वर्णाची सापत्न माता, स्वतःची कन्या आणि इतर निकटच्या नात्याच्या स्त्रियांचाही समावेश होतो[२]. याशिवाय अनेक उपपातके सांगून त्या त्या पातकांना ज्या शिक्षा सांगितल्या आहेत, त्यास त्या काळात प्रायश्चित्त म्हणत असावे.

प्राचीन भारतीय धर्मशास्त्रकारांनी जी महापातके गुन्ह्यात मोडतात. त्याच स्वरूपाच्या महापातकांना स्मृतिकारांनीही मान्यता देऊन या महापातकाचे म्हणजेच गुन्ह्याचे स्वरूप स्पष्ट केले आहेत. त्यात ब्रम्हत्या, सुरापान, गुरूपत्नीगमन, स्तेय व या लोकांशी संसर्ग ठेवणे ही पंचमहापातके मानली आहेत. याशिवाय खालील गुन्हे ही शिक्षेस पात्र मानण्यात येत असत.

१.राजा रागावला आहे, तुझे धन लुटून नेईल. सबब मजजवळ तुझे धन दे, असे सांगून एखाद्याचे धन, कन्या इत्यादीचा कपटाने अपहार करणे.
२.परस्त्री संभोग, शूद्राने ब्राम्हणादि स्त्रीशी संभोग करणे.
३.एका कन्येने दुसऱ्या कन्येस दुषित करणे.
४.माता, भार्यादिकांचा त्याग करणे.
५.दोषवतीकन्या दोष न सांगता वरास देणे, कन्या क्षतयोनी आहे असे सांगणे.
६.खोटा आळ, खोटी तक्रार करणे.

*(5) देऊळ भ्रष्ट केल्याचा गुन्हा :–*

१८ व्या शतकातील संपूर्ण समाज रचनाच ही जातीय व्यवस्थेवर, धर्ममूलक अशी होती. त्यामुळे त्या काळात धार्मिक गुन्ह्यांनाही शासन केले जात असे. मग हा गुन्हा स्त्रीकडून अथवा पुरूषाकडून कोणाकडूनही घडला तर धर्माप्रमाणे शासन होत असे. जाती व्यवस्थेनुसार मंदिराच्या गाभाऱ्यात कोणी प्रवेश करावा, कोणी नाही याची काही बंधने होती, अशी बंधने मोडणाऱ्यांना कडक शिक्षा होत असे.

'गंगा व जमना' या कलावंतिनी पुण्यातील सोमवार पेठेतील नागेश्वराच्या देऊळात शिवरात्रीच्या दिवशी गेल्या होत्या. त्यांना देवळाच्या सभा मंडपात जाण्यास हरकत नव्हती पण त्या गाभाऱ्यात गेल्या व त्यांना शंकराजी या गुरवाने प्रसादही दिला. त्यांनी गाभाऱ्यात शिरून देऊळ भ्रष्ट केल्याचा गुन्हा केला म्हणून त्यांच्याकडून २०० रूपये दंड आणि गुरवापासून २० रूपये दंड घेण्याचे ठरले[३].

१८ व्या शतकाच्या सामाजिक व धार्मिक नियमात मंदिरात कोणी प्रवेश करावा आणि कोणी नाही, याबाबत कडक नियम होते. दलितांना तर मंदिर प्रवेश निशिध्दच होता. त्यांच्याकडूनही असा काही गुन्हा घडल्यास धर्म नियमाप्रमाणे त्यांनाही कडक शासन करण्यात येत असे. हा नियम १६ व्या शतकापर्यंत अंमलात होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना मंदिर प्रवेशासाठी 'काळाराम' सत्याग्रहही केला होता. तेंव्हा या सत्याग्रहाला ब्राम्हणाकडून विरोधच झाला होता.

*(6) स्त्रीला पळवून नेणे :–*

या काळात स्त्रीला कोणत्या हेतूने पळवून नेले, त्यावर त्या गुन्ह्याचे स्वरूप ठरविण्यात येत असे. शारीरिक सुखासाठी पळवून नेणे तर काही वेळा स्त्रियांना जबरदस्तीने पळवून नेले जात असे तर काही स्त्रियांना त्यांच्या संमतीने पळवून नेले जात असे, याचाच अर्थ स्त्रीचे अपहरण विविध कारणासाठी त्या काळात केले जात होते.

'नारोजी साहस याणे पाथरवटाची बायको पलाऊन नेली'[४] बळीराम मणीराम कनोजी ब्राम्हण (तेलंग) ब्राम्हणाची स्त्री चेनपटाहून फुस लावून आणिली[५].

'बाबाजी कृष्ण बेडकर यांने तुलाजी आंगरे याची लेक घेऊन मुंबईला पळोन गेला'[६].

'नारो त्रिंबक कमाविसदार तर्फे पाल हवेली यास पत्रकी विसाजी नारायण मराठे याची कुणबीण त्रिंबक जोग व केशवभट कोनकर यांनी पळवून नेली'[७].

अशा प्रकारे स्त्रियांना पळवून नेण्याचे गुन्हे अठराव्या शतकात होत होते. दुसऱ्याची मुलगी पळवून नेऊन लग्न करणाऱ्या पुरूषास रामशास्त्रांनी 'तोफखान्यात अटकेत बिडीखेरीज ठेवावे आणि गावात भीक मागून खावे' अशी शिक्षा ठोठावली होती[८].

पेशव्यांना व त्यांच्या सरदारांना अनेक स्त्रिया करण्याचा नाद होता, त्यांच्या या विलासी ढंगामुळेच 'यथा राजा तथा प्रजा' अशी समाजातही धारणा होती. त्या काळात रक्षा बाळगणे भूषणावह समजले जाई. उदा. प्रतिनिधी घराण्यातील परशुराम श्रीनिवास यांची राख ताई तेलीण, वासोटा किल्ल्यावर ती त्याच्यासोबत राहत असे[९].

काशीताई पेठे ही त्रिंब अमृतेश्वर पेठे यांची पत्नी, दुसऱ्या बाजीराव पेशवे यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे वागून खूश करीत असे. तिला बाजीरावाने वेळोवेळी देणगी दिल्याच्या नोंद आहेत. श्रीमंत वसईहून परत आल्यावर त्रिंबकरावाचा सरंजाम जप्त केला आणि हिला वर्षाचे दोन हजार रूपये ठरवून दिले. पुढे हिच्या गैरचालीबद्दल नवऱ्याने बाजीरावाकडे हकीकत कळविली. त्यावरून हिला कैद करून त्रिंबकचे किल्ल्यावर पाठविले ही २७/०६/१८१२ रोजी मरण पावली[१०]. केशरी ही महादजी शिंदे यांची राख११ होती. तुळसाबाई ही यशवंतराव होळकरांची रक्षा होती.

अशा प्रकारे राजपुरूषाबरोबर इतरही पुरूष सुखस्वरूप स्त्रियांना रक्षा म्हणून ठेवून घेत असत. त्यांच्या लेखी स्त्रियांची किंमत केवळ उपभोग्य वस्तू अशीच दिसून येते.

त्याचप्रमाणे काही स्त्रिया कुंटिणीकडे जाऊन परपुरूषाच्या उपभोगही घेत असत, यालाच बदकर्म व सिंदळकी म्हणत. या स्त्रिया कोणत्या समाजातील आहेत, त्यांचा दर्जा पाहून त्यांना शिक्षाही दिली जात असे.

*(7) फंदफितुरीचा गुन्हा :–*

फंदफितुरीचे गुन्हे समाजात घडत असत, असा गुन्हा करणाऱ्यांना शिक्षाही होत असे. उदा. बाळ ठाकूर याच्या बायकोने

विष्णू माहदेव आठवले याचे कुणबीणीस पळून जाण्याबद्दल हिकमती शिकवल्या म्हणून बाळ ठाकूर यास ८ आणे दंड महालातून करण्यात आला[१२].

तसेच या काळात मुले पळविण्याचेही गुन्हे घडत असत. पुण्यास विसाजीपंत लेले याच्या बायकोस पुत्र झाला व मेहुणीस कन्या झाली. मेहुणीस पुत्र पाहिले असल्यामुळे तो देवून तिजपासून विसाजी पंताच्या बायकोने कन्या घेतली. हा सारा कारभार बारा दिवसाच्या आतील व बायका-बायकातील या गोष्टीस दोन महिने होऊन गेले. बातमी फुटून ती कुणकुण विसाजी पंताच्या मेहुणीच्या भ्रतारास कळली, त्याला ते रूचले नाही, त्याला सोयऱ्या-धायऱ्याचे उसने मूल नको होते, ती फिर्याद सरकारत गेली. विसाजी पंत लेल्यास पुत्र काही जड झाला नव्हता, त्याने तो परत केला[१३].

### *(9) स्त्रीच्या संसर्गाचा गुन्हा :-*

वरिष्ठ जातीचा कनिष्ठ जातीतील स्त्री संसर्ग झाल्यास तो गुन्हा मानून संसर्ग झालेल्या व्यक्तीस प्रायश्चित्त करावे लागत असे. याबाबत काही कनिष्ठ जातीच्या कुणबीनी बाबत गुन्हे घडलेले होते. त्या काळात अत्यंज जातीमधील स्त्रियांना कुणबिनी केले जात नसे. अशा वेळी उच्च जातीच्या कुणबिणीचा अत्यंजाशी संबंध येणे किंवा अत्यंज जातीच्या स्त्रीने आपली जात लपवून उच्च जातीच्या घरी कुणबीण म्हणून राहणे हे कृत्य गुन्ह्यास पात्र असे. तिच्या घरातील वावरामुळे घर विटाळत असे, ते भयंकर पाप मानले जाई. अशा वेळी ब्रम्हवृंदाकडून संबंधितांना प्रायश्चित्ताचा विधी सांगितला जाई.

तालुका शिवनेरचा मामलेदार बाळाजी महादेव याच्या घरी प्रभू जातीची एक कुणबीण होती. सुमारे अडीच वर्षे ती घरातील झाडणे, सारवणे, भांडी घासणे, भाज्या चिरणे, बिछाणे घालणे ही सर्व कामे करीत असे. एक दिवस अत्यंजाशी व्यभिचार केल्याची गोष्ट उघड झाली. ब्रम्हवृंद खवळून उठला. अत्यंजाशी अडची वर्षे संसर्ग होणे हा फार मोठा गुन्हा मानण्यात येऊन या गुन्ह्याबाबत ब्रम्हवृंदानी प्रायश्चित्त सांगितले. हे प्रायश्चित्त बाळाजी, त्याची पत्नी, त्याची आई, त्याचे चुलत बंधू, त्याचे पुत्र, त्याची सून या सर्व मंडळींना घ्यावयाचे होते. एकूण १६०० ब्राम्हणांना उत्तम प्रकारचे भोजन दक्षिणेसह द्यायचे होते. त्यासाठी ३०००/- रूपये खर्चाची मर्यादाही घालून दिली होती. श्रौती, पंडित, अध्यापक अशा ब्राम्हणांसाठी विधीपूर्वक घालावीत अशी अट होती[१४].

अत्यंजाचा संसर्ग होणे ही बाब इतकी गंभीर मानली जात असे. या प्रायश्चित्तामुळे माणसे शुध्द होतील, परंतु घरातील वस्तूंना विटाळ झाला म्हणून त्यासाठी ही या ब्रम्हवृंदानी प्रायश्चित्त सांगितले आहे.

'गृहांतून वस्त्रपात्र धान्यादिक बाहेर काढून गृहभूमीचे खनन दहन करून समार्जन करून गायीचे परिभ्रमणादिक करून प्रायश्चित्तोक्त ब्राम्हण भोजन करावे'.

१.घरातील मृत्तिकाभांडी असतील ती त्यागावी व पाकसंबंधी लाकडाची पात्र असतील ती टाकावी व पाट असतील ते तासून घ्यावे, खांब खरवडून धुवावे.
२.तांब्याची व पितळेची भांडी वगैरे धातूंची भांडी असतील ती ताऊन घ्यावी, कथलाची असतील ती आटवावी.
३.सर्व वस्तुमात्रांवर पंचगव्य प्रोक्षण करावे व घरच्या देवांची अर्च शुध्दी करावी[१५].

असे केले म्हणजे ते ब्राम्हण कुटुंब शुध्द होत असे, परंतु त्या अत्यंज स्त्रीचे काय ? त्याचा कुठेही उल्लेख येत नाही, याचाच अर्थ तिला कडक शासन झाले असणार !

अशीच एक घटना अत्यंज स्त्रीची ब्राम्हण कुटुंबास विटाळ झाल्याची ऐतिहासिक कागदपत्रातून पाहावयास मिळते. ही घटना आहे १७६५ ची. बाजीराव मोरेश्वर भावे यांच्या घरात एक चर्मकार जातीची कुणबीण होती, ती चांभारीण आहे हे चार महिन्यानंतर उघडकीस आले. तेंव्हा बाजीराव मोरेश्वर भावे व त्यांच्या शेजारी राहणाऱ्या नरहर गोपाळ या ब्राम्हण कुटुंबासही विटाळाच्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे लागले होते[१६].

ब्राम्हण प्रायश्चित्त घेऊन मोकळे होत असे, परंतु त्या काळात अत्यंज स्त्रियांना पदोपदी अपमान सहन करावा लागत होता. जणू काही त्यांचा जन्मच फार मोठा गुन्हा ठरत होता. वरील उदाहरणावरून पेशव्यांच्या काळात तर विटाळ होईल म्हणून या भीतीने अत्यंजाच्या स्त्रियांना बटीक किंवा कुणबीण म्हणूनही ब्राम्हण ठेवीत नसत. मागासवर्गीय स्त्रियांवर विविध मार्गांनी अत्याचारच करण्यात येत असे.

### *(9) जातीबाह्या कर्म करणे गुन्हा मानण्यात येत असे :-*

कोणत्या जातीने कोणता धंदा करावा या संबंधाने सूक्ष्म नियम असे व ते पाळणे समाजावर बंधनकारक असे. हे बंधन तोडून कोणीचा जातीचा धंदा सोडून दुसरा धंदा केला तर त्यास गुन्हा मानून शिक्षा करण्यात येत असे. असे कर्म स्त्रियांच्या हातूनही घडले तर तिलाही शिक्षा करण्यात येत असे.

'एक साळ्याची बाई दोन वर्ष दळण व मोलमजूरी करून राहत होती. हे कृत्य तिच्या जातीस सोडून असल्यामुळे जातवाल्यांनी तिला वाळीत टाकले'[१७]. कारण साळ्याच्या बायांनी पतीला विणकामात मदत करणे, तणणे, उकलणे, कांड्या भरून देणे हे तिचे काम असे व हे काम तिने कटाक्षाने करावे असे जात पंचायतचे म्हणणे असे. या व्यतिरिक्त कोणतेही काम करण्यास तिला परवानगी नसे, असे वरील विधानावरून दिसून येते.

असेच ज्ञातिचे निर्बंध इतर जातीतही दिसून येतात. 'एक सोनार आपणास वेदाभक्ताचा अधिकार आहे असे म्हणत. एक सोनार वेदाच्या नकला करून घेत होता, त्याबद्दल व त्याने घरात शालिग्राम बाळगल्याबद्दल त्याच्या घराची झडती घेण्यात आली व त्यास शासन करण्यात आले'[१८].

असेच एक प्रकरण घडले, एक पटवेकरी व जंगम यांचा तंत्र धंद्यासंबंधाने सुरू झाला. पटवेकऱ्याचे काम रेशीम वळण्याचे, ते काम आपलेही आहे असे जंगमाचे म्हणणे होते. तेंव्हा तो तंटा पैठण क्षेत्रातील ब्रम्हवृंदाकडे केला. त्याचा निकाल ब्रम्हससभेने देऊन पटवेकरांचे काम रेशमाचे व जंगमाचे काम कापसाचे असे ठरविले.

अशा प्रकारे १८ व्या शतकात व्यवसायाबाबत ज्ञातिबंधने कडक होती. त्याबाहेर जाऊन कोणीही काम करीत नसत, असे घडले तर जात पंचायत शिक्षा करीत असत, पेशवेही त्यात दखल देत. या कडक बंधनामुळे व्यवसाय जरी टिकून राहिले तरी त्यातून विकासाची कोणतीच संधी मिळत नसे. स्त्रियांना तर या जातसभांनी आप-आपल्या व्यवसायात जखडून टाकले होते.

### (10) गोहत्याचा गुन्हा :–

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून महाराष्ट्रात गोहत्येस बंदी होती. पेशवाईत ती अंमल होती, गोहत्या करणाऱ्यास कडक शासन करण्यात येत असे. या काळात गोहत्या केवळ मुसलमानच करीत असे नव्हे तर मांग वगैरे कनिष्ठ जातीचे लोकही असा गुन्हा करीत असत.

सन १७६३ च्या ऑक्टोबर महिन्यातील ही एक घटना आहे. मौजे कल्याण घेरा किल्ले सिंहगड येथील केदारी मांग यांच्या घरी येशा व आंबऱ्या मांग मौजे किकवी तर्फ खेडेबारे येथील रहीवासी चार महिने येऊन राहिले होते. केदारी मांग व दोघे यांनी मोघखाडीच्या रानात गेलेल्या गुरांपैकी धोंडजी करजवणा याचा काळी गाय धरून आणिली व कल्याणचे रानात दिवसा बांधून ठेवली. सायंकाळी तिघा जणांनी सुरा, कुऱ्हाड, विळे व वस्तरा यांनी जिवे मारली. धोंडजीने गाय नाहीशी झाल्याची वर्दी सिंहगडावरील शिपाई व कल्याणचे पाटील यांना दिली व ते बेरडांना बरोबर घेऊन तपासास निघाले, त्यांना जाग्याचा थांब मोघम दऱ्यात लागला. तेथून कल्याणास येऊन त्यांनी महारांच्या घरांचे झाडे घेतले. मग मांगाच्या घरात गेले तो केदाऱ्या मांगाच्या घरात मांस सापडले व मुद्दा लागला. सदर घर जप्त करून तिघा मांगाना किल्ल्यास आणून जबानी घेतली. मांग खोड्यात घालून अटकेत ठेवावे असे केशवराव जगन्नाथ (कमाविसदार ?) याने हणमंतराव साळवी यास सांगोन पाठविले. 'गुन्हा थोर आहे, पारिपत्य चांगले झाले पाहिजे, म्हणजे सर्वत्र जागा दहशत पडेल, पारिपत्याविषयी आज्ञा करण्यास स्वामी समर्थ आहे'[१९].

अशा प्रकारे पेशवाईत गोहत्येस बंदी होती व त्याची अंमलबजावणी कडक व्हावी म्हणून गाई हत्येसाठी जाऊ नये म्हणून कडक नाकेबंदी केली जात होती.

### (11) मद्यपानविषयक गुन्हे :–

पेशवाईत मद्यपान हे ही महापातक मानण्यात येत असे. प्राचीन काळापासून मद्यपानाचा महापातकात समावेश आहे, असे गुन्हे करणाऱ्यास कडक शासन करण्यात येत असे. या काळात मद्याचा प्रसार होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत असे.

सन १७७६ मधील नाना फडणविसांच्या कारकिर्दीतील मराठी राज्यातील एकंदर बंदोबस्त प्रशंसनीय होता. पुण्यात गुन्ह्यावर नजर ठेवणारे फिरस्ते प्यादे असत. त्यांना मद्यपानासंबंधी गुन्हा आढळला, तो म्हणतो, 'नारायण पेठेमध्ये बोडकी द्रवीडीण ब्राम्हण म्हातारी राहत होती, तिच्या घरात दारूने भरलेले शिसे विस पंचवीस सापडले व बकऱ्याचे मांस सापडले. ते मुद्दा सुधा चावडीस धरून आणिले चौकशीअंती ती म्हातारी दारूचा उदीम करते, कोणाची नावे सांगत नाही व ती रांड भिकारीण आहे, पैशास उत्पन्न नाही, दास मात्र सापडले, इतके माज जाले. गावात पाप बहुत होऊ लागले, त्याचे शासन यथास्थितर घडल्यास श्रेयस्कर' हे वृत्त धोंडो बाळाजी याने पेशवे सरकारात कळविले[२०]. इ.स. १८२१ मधील एक घटना अशी परीट जातीची सासू दारू प्याली व सुनास मारू लागली. एक सून तळयात जीव देण्यास गेली, ते महालाच्या शिपायाने पाहिले. सासऱ्याने सासूस आवरावे ते केले नाही. तेंव्हा महालातून परीट सासऱ्यास ८ आने मसाला झाला[२१].

दारू सासू प्याली व शिक्षा नवऱ्याला झाली, काय तर म्हणजे आपल्या पत्नीस ताब्यात ठेवता आले नाही म्हणून. असेच एक प्रकरण समोर आले होते. सई देशमुखीण चिकोडीकर हिने मद्यपान करून बाळाजी हरि जोगळेकर यास बदकर्म केले म्हणून दोघांनाही अटक करण्यात आली होती[२२].

मौजे पेठ पारगाव तर्फ खेड सरकार जुन्नर येथील बाळाजी धोंडदेव कुळकर्णी हा ब्राम्हण असा निघाला की तो कलावंतिणीशी गमन, भोजन, मांस भक्षण व सुरापान यास अट्टल बनला. या प्रकारे तो पतित झाला व त्याजबरोबर पंक्तिव्यवहार करणारे भाऊबंद अपंक्त झाले पण ही बखेडा केव्हा तरी मोडणेच जरूर होते व त्यावर उपाय प्रायश्चित्त हाच म्हणून पुण्यात ब्राम्हण सभा झाली. सर्वांना प्रायश्चित्त सांगितले, त्यात बाळाजीच्या वाट्यास पूर्वांग प्रायश्चित्त पृथ्वी प्रदक्षिणा व तीर्थस्नाने हे प्रायश्चित्त आले (पे. द. ४३)[२३].

अशा प्रकारे १८ व्या शतकात मद्यपानाचे गुन्हे स्त्री–पुरूषांकडून घडत असत. पेशव्यांच्या मद्यपानाच्या कृत्यावर कडक कटाक्ष होता. त्यामुळे मद्यपानाचा गुन्हा घडल्यास गुन्हेगारास मग स्त्री अथवा पुरूष कोणीही असो त्यांना कडक शासन करण्यात येत असे.

### (12) खुन व मारहाणीचे गुन्हे :–

मारहाणीच्या गुन्ह्याला शासन करण्यात येत असे. श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांनी राजमान्य राजश्री चिमणाजी पंडित सचिव यासी आज्ञा केली ऐसी जे अंबरी गुरव व मलारी गुरव मौजे लोहाणकर याने तुफान करून दमाजी गायकवाड यासी मारून पळाला[२४]. मारहाणीचे असे छोटे मोठे गुन्हे पेशवाईत होत होते, त्यास खुनाचा गुन्हा हा गंभीर मानण्यात येत असे.

असे खुनाचे गुन्हे स्त्रियांच्याही हातून घडत असत. एखाद्या स्त्रिने खुन केला तर तिला बहुधा फाशी देत नसत. काही वर्षे तुरूंगात ठेवल्यावर नाक–कान कापून तिला सोडून देत[२५], पुष्कळदा नुसते प्रायश्चित्त घ्यावे लागे.

पेशव्यांचे सरन्यायाधिश रामशास्त्री प्रभुणे यांच्याकडे अशीच खुनाच्या बाबतीत एक तक्रार आली होती, ती अशी – 'आपल्या बायकोने आपला दायाद ब्राम्हण विठ्ठल जोशी यासी माळयाकरवी जिवे मारले. सबब मी व माझे दायाद बहिष्कृत आहोत. मजला न कळता माझे बायकोने दुष्ट कर्म केले'. यावर न्यायाधिशाचा निर्णय असा – 'महादेव भट जोशी याचे बायकोने बुध्दिपूर्वक विठ्ठल जोशी यासी जीवे मारिले. यास्तव तिला प्रायश्चित्त द्वादशाब्द पूर्वोत्त रांगसहित संकल्प करावा. मग काशीयात्रा, रामेश्वर यात्रा करून स्वग्रामी येऊन उत्तरांगे करावी. हिचे प्रायश्चित्त विधी झाल्यानंतर महादेव भट जोशी यास प्रायश्चित्त देऊन शुध्द करावे'[२६].

यावरून पेशवाईत खुनाच्या आरोपाखाली ब्राम्हण स्त्रियांना होणाऱ्या शिक्षा या प्रायश्चित्तावर भागविल्या जात होत्या.

असेच खुनाच्या संदर्भातील तत्कालीन ऐतिहासिक पत्र पाहण्यासारखे आहे, या पत्रात म्हटले आहे की –

'प्रती रामशासत्री आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय ल्याहावे विशेष बालाजी सिवदेव भिडे वस्ती मौजे यास यांनी विदीत केले की, महादजी गोविंद उपकारी वस्ती मौजे मजकूर यासी आपण रूपये ८० ऐंसी रूपये आपण त्यास दिल्हे असता दोन वर्षे जाली. घराचे खण त्याने दिले नाहीत. यास्तव मी आपले रूपये मागो लागलो तेव्हा उपकीर मजकूर म्हणो लागला की आपणा ऐंसी रूपये पावले नाहीत. एकदा चालीस रूपये पावले ऐसे बोलो लागला. तेव्हा माझे एकेचालीस रूपये ऐंसी पैकी नाकबूल जाऊ लागला. त्यामुळे त्याची आपली कटकट होऊन हकिमाकडे गेली. माझे ऐंसी त्याकडे लागू जाले असता न देई. फिरोन आपला त्याचा फजिया जाला, तेव्हा तो वाडियांत फिर्याद केला तेथे त्यास निषेध केलीकी येक गोलकाची राकेड मारिलीस व ग्रहस्ताचे रूपये घेऊन नाही म्हणतोस तू लबाड आहेस. तुझो प्रमाण काय म्हणून बाहेर लावून दिल्हा तो आपले घरी येऊन तेच दिवशी सोमले खाऊन सायंकाळी वारला. या

अगोदर गोलकाचे रांडेस सोमल देऊन मारली होती. सबब की तिचा दादला घरी नसता याचा संदर्भ तिसी होता. यामुळे तिचे पोट वाढले. तिला मारून पंधरा दिवस जाले होते'[२७].

ही घटना म्हणजे पैसे घेऊन नाकबूल होणे, स्वतः बदकर्मातून खुन करून नामनिराळ होण्याचा प्रयत्न करणे व प्रकरण अंगाशी येताच विष घेऊन आत्महत्या करणे असे प्रकारही पेशवाईत घडत होते. लोक त्या काळात विविध कारणावरून माणसांचा खुन करीत असत, पुरूषांबरोबर स्त्रियांचाही खुन होत होता.

'मौजे जानोरी पा. दिंडोरी येथील पाटलांनी रामजी त्याची आई भूताळी म्हणून मारली. त्याजवरून पाटील मजकूरास पुण्यास आणून चौकशी केली'[२८].

तसेच 'मैनी सफरी विधवा ब्राम्हण बायको व तिचा लोक धोंडो नरसी सफेर वस्ती पेठ नारायण शहर पुणे या अवचितराव तात्याजी कुकडे ब्राम्हण नगरकर यास ओळखीमुळे आपले घरी दिपावलीत भाऊबिजेचे दिवशी रात्रौ फराळास बोलावून करंज्यात व पेढ्यांत कैफ घालून खाण्यास दिले. त्यामुळे कैफ येऊन बेसुस्त होऊन सकरीचे घरी निजोन राहिला. नंतर दोन प्रहरा रात्रीचे अंमलात सफरीने सुरी धोंडो नरसीजवळ देऊन आपला अवचितराव याचे हात धरून लेकाने मान कापून जीवे मारला व अवचितराव याचे हातात सोन्याचे कडे होते ते घेतले'[२९].

चोरीच्या मिशाने या मायलेकांनी अवचितरावांचा खुन केला असावा असे दिसते. भाऊ म्हणून ओवाळायला बोलावून व लोभासाठी खुन करणे येथपर्यंत ब्राम्हणांच्या स्त्रियांची मजल जात होती.

या काळात ब्रम्हहत्या हे ही फार मोठे पातक (गुन्हा) मानला जात असे व त्यासाठी धर्मशास्त्रकारांनी जी शिक्षा सांगितली आहे ती ब्रम्हहत्या करणाऱ्यास भोगावी लागत असे. परंतु यातही हा गुन्हा कोणी केला त्याची जात पाहून शिक्षा होत असे.

### *(13) लुटमारीचे गुन्हे :–*

१८ व्या शतकातील गुन्ह्याचे स्वरूप पाहता लुटमारीच्या गुन्ह्यात स्त्रियांचाही सहभाग असल्याचे दिसून येते. 'इ.स. १७५२–१७५३ सौ. येसूबाई डफळी यासी आज्ञा जे कसबा सावडे हा गाव खाजगीकडे असता तुम्ही त्या गावात स्वारी करून गाव लुटून नेला आणि पाटलास धरून नेला. त्यास चाळीस रूपये दंड बांधलास म्हणून विदित झाले. तुम्हांस त्या गावाशी तालुखा संबंध काय ? या उपरी गावची मालमलियेत सुतळीचा तोडा जो नेला असेल तो देखत पत्र गावीच्या गावास देऊन कबज घेऊन हुजर पाठवणे'[३०].

या पत्रावर त्या काळात स्त्रियांही लुटमार करीत असत असे स्पष्ट दिसे. परंतु लुटमार करणे हा काही फार मोठा गुन्हा समजला जात नसावा आणि स्त्रियांनी लुटमार केली. जर लुटलेला माल परत करावयास सांगून व असे पुन्हा घडू नये म्हणून ताकीद देऊन या गुन्ह्यास पांघरून घालण्यात येत असे.

### *(14) आत्महत्येचा गुन्हा :–*

एखाद्या स्त्रीने आत्महत्या केली तर त्या स्त्रीच्या पतीस प्रायश्चित्त घ्यावे लागत असे. असे खालील उदाहरणावरून दिसून येते. 'हरजी नाईक यास न्यायाधिशाकडील कामकाजास होते, त्यास चिंतामण रघुनाथ दातार याचे बायकोने जीव दिल्हा. याचा लोकोपवाद दोष आला, सबब प्रायश्चित्त देऊन घेतला'.

'रंगभट ढेकणे वास्तव्य कसबे पुणे यांनी हुजूर विदित केले की आमची सुन सौभाग्यवती उमा नाहिशी जाहली त्याचे कारण यंदा भाद्रपदमाशी रात्रौग्रहण पडिले तेव्हा स्पर्श स्नानास उमा आपला पुत्र सहा वर्षाचा घेऊन नदीस जाऊ लागली. त्यासमयी मूल दुखाणाईत आहे याजला नदीस नेऊ नये असे आम्ही बोलिलो. त्या रागाने ती स्पर्श स्नानास गेली. तिथे उदकात आपला प्राण त्याग करू लागली तेव्हा घरच्या वगैरे बायका समागमे होत्या त्यांनी माघारी घरास आणिली. आम्ही राखणेस बसलो त्यास मोक्ष स्नानास आम्हास न कळता बाहेर गेली. कुंभार वेशीपुढे नदीच्या तिरी तांब्या एका ब्राम्हणास दिल्हा. त्या उपर तिचा थांब लागत नाही. याजवरून निश्चये प्राण त्याग केला'३१. अशा प्रकारचे आत्महत्याचेही गुन्हे घडत असत. त्यासाठी प्रायश्चित्त सांगण्यात येत असे.

### *(15) अंधश्रध्देतून भुताळ्या घालण्याचा गुन्हा :–*

१८ व्या शतकात समाजावर अंधश्रध्देचा फार मोठा पगडा होता. भुते घालण्याचा प्रकारही मोठ्या प्रमाणावर होत होता. अंधश्रध्देच्या आधाराने काही लोक कायदाही हातात घेत व निरपराध स्त्रियांना त्याची शिक्षा भोगावी लागत असे. इ.स. १७५० च्या सुमारास पेशव्यांकडे आलेल्या एका गुन्ह्याचे कारण म्हणोन 'दिंडोरी येथील पाटलाने रामजी पाटील यांची आई भुताळी म्हणोन मारली'३२. सरकारच्या आज्ञेखेरीज मारली असा त्याचा गुन्हा ठरला होता. याचाच अर्थ सरकारला विचारून भुताळया घालणाऱ्या स्त्रियांना ठार मारण्यात परवानगी असावी असे दिसते.

१८ व्या शतकातील गुन्ह्याच्या स्वरूपात या ना त्या कारणाने स्त्रियांचा सहभाग दिसला तर त्यांना पुरूषांप्रमाणेच कारागृहात ठेवण्यात येत असे अथवा गंभीर गुन्ह्याबाबत त्यांचे नाक, कान कापून त्यांची धिंड काढण्यात येत असे.

### *संदर्भ ग्रंथ*

१.डॉ. काणे म. म. :'धर्मशास्त्राचा इतिहास', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, प्र. आ. १९८०, पृ. क्र. ३.
२.तत्रैव :पृ. क्र. ६.
३.भावे वा. कृ. :'पेशवेकालीन महाराष्ट्र', भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, प्र. आ. १९७६, पृ. क्र. २३३.
४.कुळकर्णी अ. रा. आणि खरे ग. ह.:'मराठ्यांचा इतिहास', खंड १ ला कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, प्र. आ. १९८४, पृ. क्र. ३६२.
५.तत्रैव :पृ. क्र. ३८६.
६.सरदेसाई गो. स. (सं.) :'पेशवे दप्तर', खंड–२, पृ. क्र. ६७.
७. तत्रैव : पृ. क्र. ७०.
८. पेशवे दप्तरातून निवडलेले कागदपत्र : क्र. ४३, पृ. क्र. ११६.
९. डॉ. देशमुख शारदा : 'शिवकाळातील व पेशवे काळातील स्त्री जीवन', पृ. क्र. १२५.

१०. गर्गे स. मा.  : मराठी रियासत उत्तर विभाग–३, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. क्र. ५५७.
११. तत्रैव  : पृ. क्र. २४, ६५.
१२. डॉ. देशमुख शारदा  : 'शिवकाळातील व पेशवे काळातील स्त्री जीवन', पृ. क्र. २२३.
१३ .तत्रैव  : उपरोक्त पृ. क्र. २२४.
१४. डॉ. गायकवाड जयसिंग : पृ. क्र. ६१.
१५. तत्रैव  : पृ. क्र. ६१, ६२.
१६. तत्रैव  : पृ. क्र. ६२.
१७. भावे वा. कृ.  : 'पेशवेकालीन महाराष्ट्र', पृ. क्र. ६२.
१८ .तत्रैव  : पृ. क्र. २३५.
१९ .सरदेसाई गो. स.  : 'पेशवे दप्तर', पृ. क्र. ४३.
२०. भावे वा. कृ.  : 'पेशवेकालीन महाराष्ट्र', पृ. क्र. २६३.
२१ .डॉ. देशमुख शारदा  : 'शिवकाळातील व पेशवे काळातील स्त्री जीवन', पृ. क्र. २२४.
२२. तत्रैव  : पृ. क्र. २४४.
२३. भावे वा. कृ.  : 'पेशवेकालीन महाराष्ट्र', पृ. क्र. २६३.
२४. सरदेसाई गो. स.  : 'पेशवे दप्तर', पृ. क्र. २५.
२५. डॉ. देशमुख शारदा  : 'शिवकाळातील व पेशवे काळातील स्त्री जीवन', पृ. क्र. २२७.
२६. तत्रैव  : पृ. क्र. २२७.
२७. आठवले सदाशिवः 'शिवाजी आणि शिवयुग', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र. आ. १९७१, पृ. क्र. १२२.
२८. पेशवे रोजनिशी  : खंड–५, पृ. क्र. ५१.
२९. तत्रैव  खंड–५, पृ. क्र. २२०, २२१.
३०. शाहू महाराजांची रोजनिशी  : भाग–१, पृ. क्र. ११८.
३१ .सरदेसाई गो. स.  : पेशवे रोजनिशी खंड–७, पृ. क्र. १९७.
३२. सरदेसाई गो. स.  : 'पेशवे दप्तर', भाग–४३, पृ. क्र. ३२.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org